स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
विद्यावाचस्पती पदवीसाठी सादर करण्यात येणारा प्रस्तावीत
संशोधन आराखडा

भारताच्या विकासात भारतीय जनता पक्षाचे योगदान
(१९८० ते २०२०)

—: संशोधक :—

प्रा. सदाशिव शरद उळागड्डे

—: मार्गदर्शक :—

डॉ. डी.के. धुमाळे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
शिवनेरी महाविद्यालय,
ता. शिरूर अनंतपाळ
जि.लातूर

सन . २०२१

प्रस्तावना :—

'भारताच्या विकासात भारतीय जनता पक्षाचे योगदान' (१९८० ते २०२०) हा विषय राज्यशास्त्राच्या 'राजकीय प्रक्रीया' या विद्याशाखेत सामाविष्ट होतो. वेबस्टर शब्दकोशानुसार राजकीय प्रक्रीया म्हणजे ''सार्वजनिक धोरणाची निर्मीती आणि प्रशासनिक प्रक्रीया पार पडत असतांना सामाजिक गट आणि राजकीय संस्था किंवा राजकीय नेतृत्व आणि लोकमत यामधील अंतरक्रीया होय.'' The Process of the formulation and Administration of public policy usually by interaction between social groups and political institutions or between political leadership and public opinion. वरील व्याख्येवरून असे दिसुन येते की, राजकीय प्रक्रियेमध्ये आपले हितसबंध जपण्यासाठी वेगवेगळया मुद्द्यावरून लोक एकत्र येत असतात आणि यातुनच पक्ष, दबाव गट आणि वेगवेगळया संस्था उभ्या होत असतात. भारताने स्वातंत्र्यानंतर संसदीय लोकशाहीचा स्वीकार केला आणि स्वातंत्र्यानंतर ७० वर्षे लोकशाही टिकुन ठेवणारा बहुदा भारत हा एकमेव देश आहे. आधुनिक लोकशाही व्यवस्थेत राजकीय पक्षांना अनन्यसाधारन महत्व प्राप्त झाले आहे. उदारमतवादी लोकशाहीत राजकीय पक्षांना घटनात्मक स्थान नसते परतु एकदंर राजकीय प्रक्रीयेमध्ये ते अत्यंत महत्वाची भुमिका पार पाडत असतात. व्यवस्था कोणत्याही प्रकारची असली तरी समान राजकीय धारणा असलेल्या लोकांचे राजकीय पक्ष हे प्रतीक असतात. 'सत्ता संपादन करणे' हा राजकीय पक्षाचा हेतु असलातरी राजकीय व्यवस्थेला स्थैर्य प्राप्त करून देण्याचे, व्यवस्थेतील विसंगतीचा नायनाट करण्याचे आणि त्यातील वेगवेगळया अंगामध्ये समन्वय साधण्याचे महत्वाचे कार्य राजकीय पक्ष करीत असतात.

भारतामध्ये बहुपक्ष पध्दती स्वीकारली गेली असली तरी स्वातंत्र्यानतंर जवळपास दोन अडीच दशके कॉंग्रेस पक्षाचे वर्चस्व भारतीय राजकारणावर होते. मात्र स्वातत्र्यापुर्वी पासुनच वेगवेगळया विचारसरणीचे विविध पक्ष अस्तीतत्वात होते. स्वातंत्र्यानतंरही भारतीय राजकारणाच्या परीघावर ते पक्ष होते. त्यामध्ये ऑक्टोबर १९५१ मध्ये स्थापन झालेला भारतीय जनसंघ हा पक्ष सांगता येईल याचे मुळ मात्र १९२५ मध्ये स्थापन झालेल्या राष्ट्रीय स्वंयसेवक संघात आढळते. स्वातंत्र्याच्या पुर्वसंध्येला जो सांप्रदायीक हिसांचार पुढे आला त्यात भाग घेतल्यामुळे १९४० च्या दशकात संघ उत्तर भारतात वाढला मात्र स्वातंत्र्यानंतर गांधीजींची झालेली हत्या आणि त्याच वेळी कॉंग्रेस वर हिंदु विरोधी आणि देशद्रोही अशी टीका केल्यामुळे संघावर बंदी घालण्यात आली. बंदी उठवावी म्हणुन शासनाचे मन वळविण्यासाठी त्यातील नेत्यांनी १९४९ मध्ये आम्ही राजकारणात भाग घेणार नाही अशी हमी दिली मात्र राजकारणामध्ये सक्रीय भाग घेण्याची सुप्त इच्छा संघामधील नेत्यामध्ये होती. आणि म्हणुन आपल्या विचाराचा जनसंघ हा पक्ष स्थापन करून त्या मुखवटयामागे संघ राहीला पुढे जनसंघ १९७७ मध्ये जनतापक्षात विलीन झाला आणि अटलबिहारी वाजपेय परराष्ट्र व्यवहारमंत्री झाले आणि या पक्षाच्या विचारसरणीत काहीसा सौम्यपणा आला १९७५ ते १९७७ मध्ये पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी लावलेली आणीबाणी यातुन झालेली नागरी स्वातंत्र्याची गळचेपी या मुदयावरून सर्व विरोधी पक्ष एकत्र आले आणि जनतापक्ष व त्याचे मित्रपक्ष यांचे सरकार स्थापंन झाले मात्र कॉंग्रेसला सत्तेवरून खाली खेचने या मुद्दयाशिवाय इतर कोणत्याही मुद्यावर पक्षामध्ये एकमत होत नसल्याने अल्पावधीतच पक्षातील मतभेद वाढले त्यातच जनता पक्षांतील इतर पक्षानी दुहेरी निष्ठेचा मुद्दा उपस्थीत केला त्याच वेळी जनतेचा या पक्षावरून विश्वास कमी होत गेला. या काळात कृषी उत्पादन कमालीचे घटले

अर्थमंत्री चरणसिंग यांनी तुटीचे अंदारपत्रक सादर केले. शेवटी पुर्वाश्रमीच्या जनसंघातील नेत्यांनी एकत्र येवुन भारतीय जनता पक्षांची स्थापना केली.

ज्या नेत्यांनी हिदुत्व आणि सास्कृंतीक राष्ट्रवाद याचा पाठपुरावा उभ्या आयुष्यभर केला त्या नेत्यांनी १९८० मध्ये अचानक गांधीवादी समाजवाद हि भाजपची विचारसरणी म्हणुन स्वीकारली व याचा स्वीकार करतांनाच सांस्कृतीक राष्ट्रवादाचा मुद्दा मात्र सोडला नाही. या काळात जातीय राजकारणावर जास्तभर देवून स्थापनेनंतर एका दशकातच हा पक्ष परीघाकडुन केंद्राकडे आला १९८९ मध्ये कॉग्रेसने शाहबानो प्रकरणात घेतलेली भुमिका यामुळे कॉग्रेसला हिंदु विरोधी ठरवुन भाजपने हिंदु व्होटबॅक आपली बनवली यातुनच १९९०च्या दशकात भाजपच्या मतांची टककेवारी २०टक्कयापर्यंत वाढली यापुढे उदयास आलेल्या ओ.बी.सी. राजकारणातही भाजपने भाग घेतला परीणामी भारताच्या राजकारणात भाजपला कॉग्रेसला पर्याय म्हणुन पाहिले जावु लागले या काळातच निवडणुक पुर्व आघाडयांच्या राजकारणाची सुरूवात झाली आणि भाजपणे इतर पक्षांबरोबर आघाडी करून निवडणुका लढविल्या. १९९८ मध्ये आघाडीचे सरकार आले प्रथम १३ दिवस त्यानंतर १३ महीने आणि नंतर वाजपेय च्या नेतृत्वाखाली भाजपणे ५ वर्ष सत्ता पुर्ण केली. १९९० नंतर हा पक्ष भारतीय राजकारणाच्या केद्रांवर राहीला २००४ तसेच २००९ मध्ये ही आघाडी विरोधी पक्षाच्या बाकावर बसली. २०१२ नंतर कॉग्रेस प्रती असलेल्या रोषाचा फायदा भाजपणे करून घेतला आणि त्याचे रूपांतर आपल्या व्होटबॅकेत करण्यात हा पक्ष यशस्वी ठरला याला पंतप्रधान नरेद्र मोदी नेतृत्वाचे वलयही तेवढेच जबाबदार होते. या काळात या पक्षाने आर्थिक, राजकीय, परराष्ट्रविषयक घेतलेल्या धोरणामुळे भारताच्या विकासावर खुप मोठा प्रभाव पडला. या पुढील काळात हा पक्ष व्यक्तीकेंद्रत्वाकडे वळला २०१९

निवडणुकात सर्वाचे अंदाज चुकवत हा पक्ष पुन्हा एकदा सर्वाधिक जागा घेवुन केंद्रात सत्तेवर आला.

एकंदरीतच भाजपने भारताच्या राजकारणात परीघाकडुन केंद्रापर्यंतचा प्रवास अत्यंत यशस्वीपणे पार केला. आज देशाच्या कानाकोपऱ्यात त्याचा विस्तार झालेला दिसुन येतो. कॉंग्रेस आणि साम्यवादी पक्ष वगळता सर्व विचार सरणीच्या पट्टयातुन भाजपला मान्यता मिळालेली आहे असे गृहीत धरण्यास हरकत नाही. या प्रवासात भाजपने केलेली कार्य त्यांची सघंटनात्मक बांधंनी आणि देशाच्या विकासात भाजपचा असलेला वाटा अभ्यासने गरजेचे ठरते म्हणुन हा अभ्यास विषय महत्वाचा ठरतो.

समस्या सुत्रन :—

संशोधनाचा विषय निवडतांना अध्ययनाचे काही पैलु निश्चित केलेले आहेत. भारतीय राजकारणात भारतीय जनता पक्षाचा झालेला उदय आणि विकास आणि भाजपने देशाच्या विकासात केलेले योगदान याचे अध्ययन आणि विश्लेषण करणे या मुख्य विषयाला अनुसरून संशोधनाची मांडणी करण्याचा मानस आहे या विषयाची मांडणी करतांना काही मुलभुत प्रश्न पुढे येतात.

१) भाजप हा अल्पावधित भारतीय राजकारणाच्या केंद्रावर का आला?

२) भारताच्या विकासात भारतीय जनता पक्षांचे योगदान कशा प्रकारचे आहे?

३) भारतीय जनता पक्षाच्या कोणकोणत्या धोरणामुळे देशाच्या विकासावर दुरगामी परीणाम झाले आहे?

४) विरोधी पक्ष म्हणुन भारतीय जनता पक्षाने कोणती जबाबदारी पार पाडली आहे?

संशोधनाची उद्दीष्टये :—

१. भाजप पक्षाच्या स्थापनेची पार्श्वभुमी समजुन घेणे आणि परीघाकडुन केंद्रापर्यंतचा प्रवास अभ्यासणे.

२. भारताच्या राजकारणावरील भाजप पक्षाच्या प्रभावाचा अभ्यास करणे.

३. भाजपच्या विस्ताराची व्युहरचना अभ्यासने तसेच संघटनांत्मक बांधणीचा अभ्यास करणे.

४. भारताच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय विकासात भाजप पक्षाने केलेल्या योगदान समजुन घेणे.

५. भाजप पक्षाच्या उदयानंतर भारताच्या बदलत्या राजकारणाचा आकृतीबंध तपासणे.

६. भाजपने विरोधीपक्ष म्हणुन केलेल्या कार्याचा आढावा घेणे.

विषयाचे महत्व :—

१. भारतीय राजकारणामध्ये तब्बल तीन दशकानंतर एकाच पक्षाला स्पष्ट बहुमत प्राप्त झाले या शिवाय विरोधी पक्ष म्हणुन मान्यता मिळविण्या इतपत जागा एकाही पक्षाला मिळविता आल्या नाहीत. असे का झाले याचा अभ्यास करून राजकारणाविषयी ठोस गणिते मांडण्यासाठी हा अभ्यास विषय महत्वाचा ठरतो.

२. १९८० मध्ये स्थापन झालेला आणि भारताच्या राजकारणात महत्वाची भुमिका बजावणारा आणि राजकारणात कॉंग्रेसला पर्याय म्हणुन पाहीला गेलेला हा एकमेव पक्ष आहे. आणि म्हणुन या पक्षाचे योगदान अभ्यासणे गरजेचे ठरते.

३. २०१० नंतर भारतीय राजकारणाच्या आकृतीबंधामध्ये बदल झालेला दिसुन येतो. एकपक्षीय वर्चस्व संपुर्ण देशभर झालेले आहे. त्या दृष्टीने भाजप पक्षांचे देशाच्या विकासातील योगदान अभ्यासणे महत्वपुर्ण ठरते.

संशोधनाची गृहीतके :—

१. भारताच्या राजकारणामध्ये भाजप पक्षाचा प्रभाव पडलेला आहे.

२. भारताच्या राजकारणामध्ये भाजप पक्षाची वाटचाल यशस्वी झाली आहे.

३. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतीक आणि राजकीय विकासात भाजपची भुमिका महत्वपुर्ण आहे.

४. भाजप पक्षाच्या उदयानंतर सत्तेची समीकरणे आणि पक्ष पध्दतीमध्ये बदल झालेले आहे.

संशोधन पध्दती :—

प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी ऐतिहासीक पध्दतीचा अवलंब करण्यात येणार आहे. तसेच वर्णनात्मक आणि विश्लेषनात्मक पध्दतीचा देखील वापर करण्यात येणार आहे.

संदर्भ साधने :—

१. प्राथमिक साधने —

प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी ज्या प्राथमिक सांधनांचा वापर करण्यात येणार आहे त्यामध्ये पक्ष कार्यालयातील माहिती विविध संदर्भ ग्रंथ, पक्षाचे अहवाल, माहिती पुस्तीका, निवडणुक आयोगाचे अहवाल, निवडणुक काळातील आकडेवारीचा आधार घेतला जाणार आहे.

२. दुय्यम साधने —

दुय्यम साधनामध्ये विविध वर्तमानपत्रामधील बातम्या विविध अभ्यासकांनी प्रसिध्द केलेल संदर्भ ग्रंथ वर्तमाण पत्रातील लेख, परीसंवाद, चर्चासत्रे आणि मुलाखती द्वारे मिळालेली माहिती ही साधने वापरता येतील.

संशोधनाची व्याप्ती :—

प्रस्तुत विषयाचे संशोधन करण्यासाठी १९८० ते २०२० हा चाळीस वर्षांचा कालावधी निश्चित केलेला आहे. या कालावधी मध्ये राष्ट्रीय स्तरावर भाजप पक्षाकडुन केलेल्या कार्याचा आणि त्यामुळे देशाच्या विकास कशा पध्दतीने झाला याचे संशोधन केले जाणार आहे. तसेच निवडणुकीतील यशापयशाच्या आधारावर भारतीय जनता पक्षाची वाटचाल आणि भारतीय राजकारणातील महत्व यावर संशोधन केले जाणार आहे.

प्रकरणाची रूपरेषा :—

प्रकरण पहीले — प्रास्तावीक

विषयाचा थोडक्यात आढावा, विषय निवडण्याची भुमिका, संशोधन विषयाचे महत्व, संशोधनाची उद्दीष्टये, संशोधनाची गृहीतके, संशोधन क्षेत्र या सर्व घटकाचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण दुसरे — भारताच्या विकासाचा आढावा

१९४७ ते २०२० पर्यंत भारताने सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतीक क्षेत्रात केलेल्या प्रगतीचा आढावा या प्रकरणात घेण्यात येणार आहे.

प्रकरण तीसरे — भारतीय जनता पक्षाचा इतिहास

या प्रकरणात भारतीय जनता पक्षाचा उदय कसा झाला तसेच हा पक्ष भारतीय राजकारणाच्या केंद्रावर कशा पध्दतीने आला याचे अध्ययन केले जानार आहे.

प्रकरण चौथे — आर्थिक आणि सामाजिक विकास आणि भाजपची भुमिका.

सदरील प्रकरणात गेल्या ४० वर्षात आर्थिक, सामाजिक क्षेत्रात भाजपाने केलेला विकास याचा सविस्तर अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण पाचवे — राजकीय आणि सांस्कृतीक विकासात भाजपची भुमिका

१९८० पासुन आज पर्यंत भाजप पक्षाने राजकीय आणि सांस्कृतीक क्षेत्रात केलेली विकासाची सदरील माहीती या प्रकरणात स्पष्ट करणार आहे.

प्रकरण सहावे — निष्कर्ष

सदरील प्रकरणात वरील पाच प्रकरणातुन निघणाऱ्या निष्कर्षाचा आढावा घेतला जानार आहे.

संदर्भ सुची —

१. पायली एम.व्ही. भारत मे संविधानीक शासन.

२. भोळे भा.ल., २००३, भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, नागपूर, पिंपळापुरे प्रकाशन.

२. पळशीकर सुहास, २००४, समकालीन भारतीय राजकारण, पुणे, प्रतीमा प्रकाशन.

३. पळशीकर सुहास आणि सुहास कुलकर्णी, २००७, महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष, समकालीन प्रकाशन

४. व्होरा राजेंद्र आणि सुहास पळशीकर, १९९६ महाराष्ट्रातील सत्तांतर, मुंबई ग्रंथाली प्रकाशन.

५. सुहाश पळशीकर २०१४ देश प्रदेश प्रादेशीक राजकारणाच्या बदलत्या दिशा, युनिक प्रकाशन पुणे.

६. सुहाश पळशीकर भारतीय लोकशाहीचा अर्थ आणि व्यवहार.

७. Brass Paul, 1990, Politics of India since Indepece, New Delhi.

८. Hasan Zoya, Politics and State in India

९. Vhora Rajendra and Suhas Palshikar, 2004, Indian Democrocy Meanings and Practies, New Delhi, Sage Publication

१०. Report on General Elections in India.

११. Kohali Autl, 2001, the success of Indian Democrocy Combridge Publication.

१२. Hasan Zoya, 2002, Parties And Party Politics in India.

१३. Bharatiya Janata Party, Our Five Commitments Delhi.

१४. Economic and political weekly.

—: संशोधक :—

प्रा. सदाशिव शरद उळागड्डे

—: मार्गदर्शक :—

डॉ. डी.के. धुमाळे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
शिवनेरी महाविद्यालय,
शिरूर अनंतपाळ